MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

maharashtraaarambh@gmail.com

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात

बीड (महाराष्ट्र) सायं.दैनिक मराठी वर्ष -०१ अंक -८९ सोमवार दि.१८ डिसेंबर २०२३ आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ किंमत ३ रू । पाने ४

Beed (Maharashtra) Daily Evening MARATHI Year-01 Issue -89 MONDAY DT.18 DECEMBER 2023 RNI : MAHMAR/2023/83965 PRICE - 3 RUPEES PAGES - 4

## तांबवा येथे लाभार्थींना विविध योजनांच्या कार्डचे केले वाटप

केज ।प्रतिनिधी

केंद्र सरकारच्या लोकोपयोगी योजनांची माहिती व लाभ तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रेरणेतून सुरू असलेल्या विकसित भारत संकल्प रथयात्रेचे रविवारी तांबवा ( ता. केज) येथे आगमन झाले. या रथयात्रेचे उद्घाटन आमदार नमिता मुंदडा यांच्या हस्ते व लाभार्थींना विविध योजनांचे कार्ड वाटप करण्यात आले. या वेळी ग्रामस्थांसह लाभार्थींना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संबोधित केले, तर आ. मुंदडा यांनी विविध योजनांची माहिती लाभार्थींसह ग्रामस्थांना दिली. विकसित भारत संकल्प यात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद देखील मिळत असल्याचे सांगितले.या वेळी तहसीलदार अभिजित जगताप, गटविकास अधिकारी राजेंद्र मोराळे, भाजपचे तालुकाध्यक्ष भगवान केदार, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती डॉ. वासुदेव नेहरकर, एकात्मिक महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी शोभा भिंतीपत्रकाचे प्रकाशन करताना आ. नमिता मुंदडा, तहसीलदार जगताप, बीडीओ मोराळे. लटपटे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. विकास आठवले, भाजपचे केज विधानसभा अध्यक्ष शरद इंगळे, सुनील घोळवे, राहुल गदळे, संतोष जाधव, चंदू मिसाळ, सुदाम पाटील, विकास जाधव, खदीर खुरेशी, राजाभाऊ डोईफोडे, सरपंच दीपाली अरुण चाटे, माजी सरपंच सदाशिव चाटे, रामधन चाटे, दिनकर चाटे, परमेश्वर खरमाटे, शिवाजी चाटे, श्रीधर कराड यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाला गावातील लाभार्थींसह महिला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माजीमंत्री जयदत्त क्षीरसागरांच्या प्रयत्नाला यश

# नव्या सुसज्ज बसस्थानकाच्या कामाला सुरुवात

बीड / प्रतिनिधी

गेल्या अनेक वर्षांपासून बीडकरांचे नव्या बसस्थानकाचे स्वप्न अखेर पूर्ण होणार आहे,माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या प्रयत्नाला अखेर यश आले आहे,लवकरच बीडच्या नव्या आणि सुसज्ज अशा सर्वसोयींनी युक्त अशा बीड बस स्थानक व बस आगाराचे काम सुरू झालेले आहे,आज माजीमंत्री क्षीरसागर यांनी कामाची पाहणी केली

आज माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी बीडच्या नव्या होत असलेल्या बसस्थानकाच्या बांधकामाची पहाणी केली यावेळी विभागीय नियंत्रक मोरे,काझी संघानि कन्स्ट्रक्शनचे समीर काझी अतुल संघांनी,जगदीश काळे दिनकर कदम,अरुण डाके,गंगाधर घुमरे, गणपत डोईफोडे,अरुण बोंगाणे, मुखीद लाला,दादासाहेब मुंडे,राणा चव्हाण,आशिष काळे,अर्जुन बहिरवाळ, भागवत पौळ,प्रवीण सुरवसे,सुभाष क्षीरसागर,नाना मस्के,राजू आतकरे,कलंदर पठाण,बबन वडमारे,अजय धाडे,महेश गुजर,सुभाष गायकवाड, तौफिक पठाण,गोविंद जाधव,आदींसह आगारातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते

बीड हे जिल्ह्याचे ठिकाण असून या ठिकाणी असलेले सध्याचे बस स्थानक हे ५० वर्षा पूर्वी बांधलेले होते त्याची अत्यंत वाईट आवस्था झालेली आहे. बीड बस स्थानकातुन रोज राज्यातील सर्व जिल्ह्यात मिळून ८०० बसेस ची ये जा आहे. या बस स्थानकात मोठ्या प्रमाणांत प्रवासी प्रवासासाठी या बसस्थानकांचा वापर करतात या बसु स्थानकात कोणत्याही सोयी उपलब्ध नाहीत शौच्छालये मोडकळीस आलेले आहेत,आसन व्यवस्था नाही,स्वच्छता नाही, पाण्याची सुविधा नाही ज्या ठिकाणी बसेस थांबतात. त्या ठिकाणी पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचते हा परिसर हि चिखलमय होतो.

या सर्व बाबी पाहता आपल्या कडे या बस स्थानकाबाबत आनेक पालकमंत्री असतांना हे बसस्थानक व आगार नविन



निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनाकडे दिल्या नंतर महाराष्ट्र शासनाने निधी बाबत अडचण सांगितल्या नंतर हे बस स्थानक बी.ओ. टि. तत्वावर निर्माण करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आलेला होता यात व्यापारी संकुल नविन बस स्थानक,नविन बस आगार व हे सर्व अद्यावत करण्याचा जवळपास १०० कोटीचा बी. ओ.टी. तत्वावर करण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आलेला होता व त्यास तत्कालीन महाराष्ट्र शासनाने आपल्या पालकमंत्री पदाच्या कालावधी मध्ये मंजुरी दिली होती. तत्कालीन महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे अध्यक्ष, जीवनराव गोरे यांच्या उपस्थितीत भुमिपुजन हि झाले परंतु दरम्यानच्या काळात विधान सभेच्या निवडणुका जाहिर झाल्यामुळे आचार संहिता लागल्यामुळे पुढील काम झाले नाही राज्यात सतांतर झाल्यामुळे पुढील सरकार मधील मंत्री दिवाकर रावते यांनी हा संपूर्ण प्रस्ताव प्रलंबित ठेवला व पुढे तो रद्द केला. बीड बस स्थानकांचे काम पुर्ववत सुरु व्हावे या साठी माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी आपल्या आमदारकीच्या काळात ४ वेळा विधान सभेत लक्षवेधी सुचना मांडत हे काम तातडिने व्हावे अशी मागणी केल्यानंतर बी.ओ.टी. तत्वावरील काम रद्द करुन ते महामंडळाकडुन करण्याचा निर्णय झाला, सुरुवातीला हा प्रस्ताव ६.०० कोटी रुपयाचा होता त्यात सुधारणा करुन तो मागणी केल्या नंतर १३ कोटी रुपयाचा करण्यात आला व या कामाचे पुन्हा भुमीपुजन तत्कालीन मंत्री आदित्य ठाकरे व तत्कालीन मंत्री दिवाकर रावते यांच्या उपस्थितीत मंत्री असतांना करण्यात आला या वेळेस हि पुन्हा विधान सभेची निवडणूक लागली व हे काम पुन्हा प्रलंबित झाले. पुढील काळात माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या प्रयत्नातुन हे काम सुरु झालेले असून आज त्यांनी प्रत्यक्ष पहाणी केली, बस आगाराचे काम प्रगती पथावर आहे व बसस्थानकांचे काम अंतिम सुरू झालेले आहे.लवकरच या नव्या बसस्थानकाचे काम पूर्ण होणार असून काझी संघांनी ग्रुपच्या वतीने हे काम पूर्ण करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न चालू आहेत,काझी संघांनी कन्स्ट्रक्शनने आष्टी,अंबाजोगाई आणि औसा येथील बसस्थानकाचे देखील काम केले आहे,२२ वर्षांपासून हा ग्रुप बांधकाम क्षेत्रात काम करत असल्यामुळे बीडचे काम देखील त्याच तुलनेत होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे,नविन व्यापारी संकुलाचे १०० कोटीच्या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्याचे समजते.

## महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळातून कीटक नाशके व अन्य साठ्यांचा गैरव्यवहार होऊ नये, यासाठी

## अधिकाऱ्यांना विशेष प्रशिक्षण देणार - धनंजय मुंडे

### अकोला जिल्ह्यातील कीटकनाशकांच्या अपहार प्रकरणातील दोषी भांडारपाल निलंबित, पोलीस केस दाखल, विभागीय चौकशी सुरु - मुंडेंची विधानपरिषदेत माहिती

नागपूर ।प्रतिनिधी

महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाच्या माध्यमातून कीटकनाशकांसह उपलब्ध करण्यात आलेल्या अन्य साहित्याच्या साठ्याच्या बाबतीत घडणाऱ्या अपहाराच्या घटनांवर कायमस्वरूपी आळा घालण्यासाठी अधिकाऱ्यांना विशेष प्रशिक्षण देण्याचे नियोजन करण्यात येत असल्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी आज विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात बोलताना स्पष्ट केले.

अकोला जिल्ह्यातील महामंडळाच्या विभागीय कार्यालयात कार्यरत असलेल्या वाशिमकर नामक भांडारपालाने कीटकनाशकांच्या सुमारे ३८ लाख रुपयांच्या केलेल्या



अपहारावरून आमदार अमोल मिटकरी यांनी विधान परिषदेत प्रश्न उपस्थित केला होता. यावर कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी उत्तर देताना संबंधित भांडारपालास निलंबित करण्यात आले असून त्याच्यावर विभागीय चौकशी सुरू आहे, तसेच या अपहाराच्या संदर्भात नेमण्यात आलेल्या सत्यशोधक समितीच्या अहवालानुसार संबंधित भांडारपालावर अकोला एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा देखील दाखल करण्यात आला असल्याचे धनंजय मुंडे यांनी सांगितले.

महामंडळाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना लाभ मिळावा हा अंतिम उद्देश शासनाचा असतो; मात्र कोणत्याही कर्मचारी किंवा अधिकारी यांनी शासनाची फसवणूक करून शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करण्यात आलेल्या सामग्रीचा अपहर करत असतील तर अशा अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांची सरकार गय करणार नाही. त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल, असेही धनंजय मुंडे यांनी यावेळी स्पष्ट केले.

यासंदर्भात कारवाई गतीने पूर्ण केली जावी, तसेच संबंधित दोषी कर्मचाऱ्याने याआधी देखील अशा स्वरूपाचे गुन्हे केले आहेत का, याचाही तपास केला जावा अशी मागणी आ.प्रवीण दरेकर, आ.भाई जगताप आदींनी केली असता, सत्यशोधक समितीच्या अंतिम अहवालात सर्वकाही स्पष्ट होईल व दोषीवर कायदेशीररित्या कठोर कारवाई केली जाईल, असे धनंजय मुंडे यांनी स्पष्ट केले.

## फायनान्स कंपनीला बनावट सोने देऊन २१ लाखांचे कर्ज

### मास्टरमाइंड अटकेत, ७ जणांवर गुन्हा दाखल

बीड ।प्रतिनिधी

खासगी फायनान्स कंपनीकडून सोने तारण कर्ज घेताना कंपनीला सोन्याचा मुलामा दिलेले बनावट दागिने देत स्वत:सह इतर ६ जणांना २१ लाखांचे कर्ज मिळवून दिले. तिसऱ्या वेळी कर्जाची मागणी करण्यासाठी आल्यानंतर मागील वेळी तारण ठेवलेल्या दागिन्यांसारखेच दागिने असल्याने कर्मचाऱ्यांना संशय आला व तपासणीतून भंडाफोड झाला. या प्रकरणी ७ जणांवर गुन्हा दाखल झाला असून मास्टरमाइंड किसन कानडे याला अटक झाली.इंडिया इन्फोलाइन फायनान्स लिमिटेड नावाच्या खासगी फायनान्स कंपनीचे बीडमध्ये सुभाष रोडवर कार्यालय आहे. या कंपनीकडून सोने तारण कर्जही दिले जाते. किसन उमाजी कानडे (रा. रज्जाकपूर, ता. बीड) याने सोन्याच्या १२ बांगड्या व २० अंगठ्या तारण ठेवून ६ लाख ३८ हजार रुपयांचे कर्ज घेतले होते. मात्र या वेळी कंपनीने केवळ सोन्याची वरवर तपासणी केली होती. दरम्यान, १६ डिसेंबर रोजी किसन कानडे हा पुन्हा कर्ज मागणीसाठी आला. या वेळी त्याने आणलेल्या आणलेले दागिने हे पूर्वीच्या दागिन्यांसारखे असल्याचे कर्मचाऱ्यांच्या लक्षात आले. दरम्यान, या प्रकरणी किसन उमाजी कानडे, संतोष किसन कानडे, विलास भीमराव थोरात, पुष्पाबाई महादेव धुताडमल, शहादेव महादेव कानडे, दत्ता भीमराव थोरात व या सर्वांना बनावट दागिने तयार करून देणारा बिपिन जाधव यांच्यावर गुन्हा दाखल झाला.

## पंकजाताई मुंडे राज्याच्या राजकारणात महत्त्वपूर्ण जबाबदारी मिळण्याची शक्यता नागपूर बैठकीत उपस्थित राहत सक्रिय सहभाग

बीड ।प्रतिनिधी

राज्याच्या तात्कालिन ग्राम विकास मंत्री तथा भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे ह्या राज्याच्या राजकारणात पुन्हा सक्रिय झाल्या आहेत. नुकतीच नागपूर येथे भाजप पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न झाली, आगामी लोकसभा अन् विधानसभा जिंकण्यासाठी ताईंनी या बैठकीत भाजपच्या पदाधिकाऱ्यांमध्ये जोश निर्माण होईल, असे मार्गदर्शन केले. यावेळी त्यांच्या या भाषणाने

सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. पंकजाताई मुंडे ह्या एक मास्लिडर आहेत, त्यांच्या ताईंच्या भाषणाने वेधले सर्वांचे लक्षनागपूर येथील बैठकीत पंकजाताई भरभरून बोलल्या. फडणवीस आणि मुंडे यांच्यातील ताणलेले संबंध सुरळीत करण्यासाठी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पुढाकार घेतला होता, त्यांची मध्यस्थी या निमित्ताने कामी आल्याची चर्चा बैठकीप्रसंगी ऐकावयास मिळाली. त्यामुळे आता येत्या काळात पंकजाताई उत्स्फुर्तपणे राज्यातील भाजपच्या बैठका आणि कार्यक्रमात सहभागी होतील, असे चित्र दिसून येत आहे नेतृत्वाचा महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात मोठा प्रभाव आहे.त्यामुळेच त्यांना आता पक्ष सोबत घेवून चालत असल्याचे पहायला मिळत आहे. परळीत झालेल्या




आगामी लोकसभा अन् विधानसभा जिंकण्यासाठी ताईंनी बैठकीत भाजपच्या पदाधिकाऱ्यांमध्ये निर्माण केला जोश

शासन आपल्या दारी या कार्यक्रमानंतर पुन्हा एकदा पंकजाताई राज्याच्या राजकारणात सक्रिय झाल्याचे पहायला मिळत आहे. या कार्यक्रमाला त्यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी मुंबईवरून येताना एकत्रित प्रवास केला, यावेळी दोघात संवादही घडून आला. त्यामुळे दोघातील ताणले गेलेले संबंध पुर्णपणे सुरळीत झाल्याचे पहायला मिळत आहेत. याशिवाय नागपूरमध्ये महाराष्ट्रातील भाजप पक्ष संघटनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत तीन राज्यात झालेल्या निवडणूकीत भाजपने यश संपादन केल्याने सर्वांचा उत्साह दुणावला होता. यावेळी माजी मंत्री पंकजाताई मुंडे ह्या देखील दोन पावले पुढे आल्या. या बैठकीप्रसंगी पंकजाताई मुंडे यांनी पदाधिकाऱ्यात जोश निर्माण करणारे मार्गदर्शन केले. त्यासोबतच गेल्या काही दिवसात पक्षाच्या लहान मोठ्या पदाधिकाऱ्यांना कामाचा खुप ताण आहे. हा ताण थोडा कमी करावा, अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली. आगामी काळात लोकसभा आणि विधानसभा निवडणूका असल्याने कार्यकर्त्यांना ताण येईल असे काम देवू नका असेही त्या वेळी म्हणाल्या.

## पतसंस्था, अर्बन, निधी, को-ऑपरेटिव्ह आणि मल्टीस्टेटवाल्यांना परवानग्या मिळाल्या कशा, बँका उभ्या केल्या कशा, सभासद करो जमा केले, ठेवी कुणाच्या अन् किती, कर्ज वाटप किती ? ओरिजनल ठेवी अन् बँकेतील ठेवींचा ताळेबंद आहे का?

# स्वयंघोषित 'सहकामहर्षींचा' पर्दाफाश करणार -प्रा.सचिन उबाळे

बीड जिल्ह्यामध्ये अनेक बँका सध्या धोक्याच्या पातळीवर आहेत. त्यामुळे सर्वसामान्य ठेवीदारांच्या हितासाठी आम्ही मोठं आंदोलन उभा करणार आहोत. शहर आणि संपूर्ण जिल्ह्यातील पतसंस्था, अर्बन, को-ऑपरेटिव्ह , मल्टीस्टेट, निधी आणि इतर ज्या काही दुकानदार्या थाटून बसलेले स्वयंघोषित 'सहकारमहर्षीं'चा आम्ही पर्दाफाश करणार आहोत त्यामुळे ज्यांच्या काही ठेवी अशा प्रकारे अडकलेल्या असतील किंवा कुठल्याही बँकेबद्दल त्यांच्याकडे काही पुरावे असतील अशा जागरूक लोकांनी आमच्याशी संपर्क करावे असे आवाहन स्वाभिमान संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा.सचिन भैया उबाळे यांनी केले आहे.

ज्ञानराधा,मातोश्री, जिजाऊ, साईराम, राजस्थानी, मराठवाडा अर्बन पतसंस्था माजलगाव अशा प्रकारच्या बँकांना घरघर लागली आणि सर्वसामान्य ठेवीदारांचा जीव टांगणीला लागला. जिजाऊंचे नाव घेवून संस्था स्थापन करणारे बबन शिंदे, अनिता शिंदे,व, ज्ञानराधा चे सुरेश कुटे,यांनी तर कळसच केला आहे. पैसे वाटप करणार असल्याचे सांगितल्यानंतर जानेवारीकडे वाटचाल सुरू झाली तरी त्यांनी आणखी कुणालाही एक रुपया दिला नाही. अक्षरश: लोकांनी रडू रडू पैसा मागितले परंतू त्यांना कसल्याही प्रकारचा पाझर फुटला नाही.



दवाखाना, लग्न, घर बांधणी, मुलांचे शिक्षण एवढेच नव्हे तर रोजचा संसारगाडा चालविण्यासाठी देखील ठेवीदारांची कसरत झाली परंतू त्यांच्याकडे कोणीच लक्ष दिले नाही. जिजाऊ नंतर साईराम आणि ज्ञानराधाच्या बाबतीतही तशीच परिस्थिती निर्माण होत आहे. अगदी सोशलमीडियावर ठेवीदार आपल्या ठेवी मागत आहेत. आज, उद्या, परवा अशा तारखांनाही त्यांना तोंड द्यावे लागत आहे. जे या बँकांच्या बाबतीत झाले ते इतर बँकांच्या बाबतीत होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळेच आम्ही आता बीड जिल्ह्यातील सर्वच बँकांच्या बाबतीत प्रशासनाला निवेदन देणार असून सर्व बँकांची सध्याची स्थिती काय आहे ? या माध्यमातून ग्राहकांना जागे करण्याचे काम आम्ही करणार आहोत. त्यासाठी प्रशासकीय पातळीवर हालचाली सुरू करण्यात आल्या आहेत. यामध्ये सदरील सर्वच संस्था कशा प्रकारे सुरू करण्यात आल्या. सुरूवातीच्या काळात जमा करण्यात आलेल्या सभासदांपासून तर ठेवी जमा करणे आणि त्याचा विनियोग कशा प्रकारे केला आहे ? त्याची इत्तमभुती माहिती आम्ही संबंधीत जबाबदार प्रशासकीय अधिकार्यांकडून मागवणार आहोत. या संबंधीत लवकरच आंदोलनाची दिशा ठरविण्यात येणार असून सर्वसामान्य नागरिकांनी तो पर्यंत आपले व्यवहार सावधपणे करावेत कारण जेवढ्या बँकांमध्ये ठेवी आहेत तेवढ्याचं खरंच ऑडीट होते का? हा सुध्दा महत्त्वाचा विषय आहे.

### अध्यक्ष,संचालक, व्यवस्थापकांच्या मालमत्तांची चौकशी करा नसता आमरण उपोषण

बीड शहरामध्ये अनेक जण या बँकांच्या जोरावर रिअल ईस्टेट, कारखाने उभा करून अलिशान गाड्या देखील वापरत आहेत. पैसा सर्वसामान्यांचा आणि वापर मात्र स्वत:साठी त्यामुळे अशा संस्थांमधील अध्यक्ष, संचालक, नातेवाईक, व्यवस्थापकांच्या मालमत्तांची चौकशी करण्याची मागणी प्रा.सचिन उबाळे यांनी केली आहे. यासाठी वेळ प्रसंगी आपण आमरण उपोषण देखील करणार असल्याचे प्रा सचिन भैय्या उबाळे यांनी म्हटले आहे.

अतिक्रमण जागेवरील बांधकामास स्थगिती देऊन जागेचा ताब्या साठी विश्वनाथ गोरे यांचे

# जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू

बीड ।प्रतिनिधी

विश्वनाथ गोरे यांच्या ताब्यामधे व मालकी हक्क असलेली प्लॉट लक्ष्मीनगर लक्ष्मीटॉकीजच्या पाठीमागे बीड सव्र्व्हे नं.९४ साईज १५ द ३० असा असुन सदर प्लॉट खरेदी खता अधारे विकत घेतलेला आहे. मात्र शेजारी राहणारे मधुकर गोविंद साठे यांनी सदर प्लॉटवर विना बांधकाम परवाना बेकायदेशीर बांधकाम चालु केले आहे. ते चुकीचे आहे. सदर प्लॉटवर बेकायदेशीर अतिक्रमण करीत आहे. सदर प्लॉट विश्वनाथ गोरे यांच्या मालकीचा असुन त्या प्लॉटवर घरकुल योजने मार्फत बांधकाम करत असल्याचे कळत ते की शासनाची फसवणुक करीत आहे. दि.१७/०८/२०२३ रोजी मा पोलीस अधिक्षक बीड यांना कळवुनही आज तागायत कसल्याच प्रकारची चौकशी किंवा कार्यवाही झालेली नाही. तसेच मा. मुखधिकारी साहेब नगर परिषद बीड यांना दि.२१/०८/२०२३ रोजी प्लॉटवर विनापरवानगी बेकायदेशीर बांधकाम जे की घरकुल योजनेतुन करत असुन त्यांचबरोबर योग्य ती कार्यवाही करण्याबाबत कळवुन देखील कसल्याच प्रकारची कार्यवाही करण्याबाबत कळवून देखील कसल्याच प्रकारची कार्यवाही केलेली दिसुन येत नाही.



मालकी व हक्क असलेली प्लॉटवर शासनाचे विविध योजनेतुन बेकायदेशीर करत असलेले बांधकाम करत असल्या बाबत कार्यवाही करुन माझ्या प्लॉट मला रितसर देऊन न्याय करावा या मागणीसाठी मा. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर गोरे कुटुंबीय बेमुदत आमरण उपोषणास बसले आहेत .

# नगर रोड ते पालवण चौक रस्त्याचे रुंदीकरण, सिमेंट कॉंक्रेटचा रस्त्याचे काम सुरु करा

## जिल्हाधिकारी कार्यालया समोर कौशल्य मस्के यांचे उपोषण सुरू

बीड ।प्रतिनिधी

शहरातील नगर रोड पासून जाणारा धानोरा रोडची गेल्या ५ ते ७ वर्षापासुन अत्यंत दुरावस्था झालेली आहे. या धानोरा रोड परिसरात जवळपास सुमारे २० ते २५ हजार लोकवस्ती आहे त्यामुळे शहराती नगरपरिषद हद्दीतील एक प्रमुख रस्त्यामध्ये याची गणना केली जाते. तसेच या धानोरा रोड परिसरात चार मोठ्या शैक्षणिक संस्था देखिल आहेत. या शैक्षणिक संस्थामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहेत. त्यामुळे या रस्त्यावर नेहमीच वर्दळ असते परंतू या रस्त्याची दुरावस्था झाल्याने विद्यार्थ्यांना देखील चालत जाणे कठीण झाले आहे. पावसाळ्यात तर अक्षरशा: गुडगाभर पाण्यातून शाळेत जावे लागते, तसेच या रस्त्यालगत असणाऱ्या व्यापाऱ्यांना याचा आर्थिक च धुळिचा त्रास सहन करावा लागत आहे. अशा अनेक बाबी या रस्त्याच्या दुरावस्थेमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे आपण स्वतः लक्ष देऊन तात्काळ नगर रोड ते पालवन चौक असणा-या धानोरा रोडचे सिमेंट कॅक्रेटीकरण व रुंदीकरणाचे काम मार्गी लावावे अन्यथा लोकशाही मार्गाने दिनांक १८/१२/२०२३ पासुन धानोरा रोड परिसरातील नागरिकांसह अमरण उपोषणाला सुरुवात केली आहे. त्यांच्या उपोषणाला अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी थेट भेट देऊन पाठिंबा दिला आहे.




# आ.संदीप क्षीरसागरांची साथ सोडत राजूभाऊ महुवाले यांनी बांधले शिवबंधन

## जिल्हाप्रमुख गणेश वरेकरांच्या नेतृत्वात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटात जाहीर प्रवेश

बीड ।प्रतिनिधी

आ.संदीप क्षीरसागर यांचे विश्वासू आणि एकनिष्ठ सहकारी राजूभाऊ महुवाले यांनी त्यांची साथ सोडत आपल्या असंख्य सहकाऱ्यांसह शिवसेनेचे बीड जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांच्या नेतृत्वात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटात जाहीर प्रवेश केला.




गणेश वरेकर यांच्यावर शिवसेनेच्या बीड जिल्हाप्रमुख पदाची जबाबदारी पडताच त्यांनी आपल्या बीड मतदार संघात शिवसेना बळकट करण्यासाठी कंबर कसली आहे. त्यांना जिल्हाप्रमुख पद मिळाल्यानंतर मतदार संघात आणि शिवसैनिकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. त्यांच्या नेतृत्वात अनेक युवा कार्यकर्ते शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटात प्रवेश करताना पहावयास मिळत आहे. बीड शहरातील शाहू नगर भागातील आ.संदीप क्षीरसागर यांचे विश्वासू आणि एकनिष्ठ राहिलेले सहकारी राजुभाऊ महुवाले यांनी आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह रविवार दि.(१७) रोजी शिवसेनेचे आ.सुनिल प्रभू यांच्या हस्ते शिवबंधन बांधले. राजुभाऊ महुवाले हे अनेक वर्षांपासून शाहू नगर भागातील नागरिकांचे प्रश्न सोडवत आहे. त्यांनी शाहू नगर भागात अनेक सामाजिक उपक्रम राबविले आहेत. नागरिकांच्या सुखा दुःखात धाऊन जाणारे व्यक्तिमत्व आहे. त्यांच्या प्रवेशाने शाहू नगर आणि बीड शहरात शिवसेना (उबाठा) गटाची ताकत नक्कीच वाढली आहे.

यावेळी बीड जिल्हा संपर्क प्रमुख किशोर पोतदार, जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, परमेश्वर सातपुते, रत्नाकर शिंदे, महिला आघाडी च्या संपर्क प्रमुख संपदाताई गडकरी, महिला आघाडी जिल्हाप्रमुख संगीताताई चव्हाण, उपजिल्हाप्रमुख सुशील पिंगळे, तालुकाप्रमुख गोरख सिंघण, शहरप्रमुख शेख निजाम यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी सचिन चंदनशिव, मुकेश गाडे, निलेश लोंढे, तुकाराम हांडे, प्रदीप खोड, किशोर गायकवाड, संतोष दराडे, संतोषी साळुंखे, रामदास खोड,अमित जोगदंड यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# शेतकरी आत्महत्या राष्ट्रीय आपत्ती, शेतकऱ्यांचे मरण त्याला कायदेच कारण

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन :- डॉ.गणेश ढवळे

बीड ।प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या आत्महत्या ही राष्ट्रीय आपत्ती आहे.शेतकरी विरोधी कायदे करणे सरकारचे राष्ट्रीय कर्तव्य आहे.राज्यामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढले असुन गेल्या १० महिन्यात महाराष्ट्रात २४७८ तर मराठवाड्यात ११ महिन्यात १००० पेक्षा जास्त तर बीड जिल्ह्यात ११ महिन्यात २५४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची शासन दरबारी नोंद आहे.




सततची नापिकी, शेतीमालाला भाव नसणे ही वरवरची कारणे असली तरी १) कमाल शेतजमीन धारणा कायदा (सिलिंग) २ ) आवश्यक वस्तू कायदा ३) जमिन अधिग्रहण कायदा हे शेतकऱ्यांना गळफास ठरणारे शेतकरी विरोधी कायदे रद्द करण्यात यावेत यासाठी आज दि.१८ डिसेंबर सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालया समोर धरणे आंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत राष्ट्रपती, पंतप्रधान, राज्यपाल, मुख्यमंत्री, प्रधान सचिव यांना जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात शेख युनुस, रामनाथ खोड,सुदाम तांदळे, शेख मुबीन,शिवशर्मा शेलार, धनंजय सानप ,शेख मुस्ताक,आसाराम सुर्वे, कल्याण शेलार आदि सहभागी होते.

दि.१९ मार्च १९८६ रोजी चिलगव्हाण जि.यवतमाळ येथील शेतकरी साहेबराव करपे यांनी शासनाची शेतकरी विरोधी धोरणे व त्यातुन शेती व्यवसायात येणारे अपयश हेच सामुहिक मरणकांडाचे मुख्य सुत्र होते.त्यांची पत्नी मालती, विश्रांती (मुलगी)मंगला (मुलगी),सारीका (मुलगी)व भगवान (मुलगा) यांनी वर्धा जिल्ह्यातील दत्तपुर आश्रमात विषयुक्त अन्न देऊन सामुहिक आत्महत्या केली होती.या घटनेला ३८ वर्षे होत असुन किसान पुत्र आंदोलनाचे प्रणेते अमर हबीब यांच्या नेतृत्वाखाली २०१७ पासुन १९ मार्च रोजी राज्यभर पायी दिंडी यात्रा काढण्यात येते.त्यामुळे १९ मार्च रोजी शेतकरी आत्महत्या सहवेदना दिवस म्हणून एकदिवसीय उपोषण करण्यात येते.यात सर्वांनी सहभागी व्हावे.

# राज्यातील ग्रामपंचायतीचे कामकाज राहणार ठप्प

## बीड जिल्ह्यातील १०३३ ग्रामपंचायतींचा समावेश




गेवराई । प्रतिनिधी

सरपंच, ग्रामसेवक, ग्रामरोजगार सेवक, ग्रामपंचायत कर्मचारी व संगणक परिचालकांच्या विविध मागण्यांसाठी १८ ते २० डिसेंबर या तीन दिवसासाठी राज्यव्यापी आंदोलन पुकारले असून या कालावधीत बीड जिल्हयातील १०३३ ग्रामपंचायतींचे कामकाज बंद ठेवण्याचा निर्णय संबंधित सर्व संघटनानी एकत्रित घेतला आहे. राज्यातील एकूण २७ हजार ८६९ ग्रामपंचायतींचे कामकाज बंद राहणार आहे.

राज्यातील सर्वच ग्रामपंचायती आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी ग्रामपंचायतीचे उत्पन्न वाढवणे. ग्रामपंचायत कराची वसुली परिणामकारक होण्यासाठी या विषयावर ग्रामविकास विभागाने तातडीने बैठक घेऊन निर्णय घ्यावा. आमदार निधी प्रमाणे स्वतःच्या वार्डाच्या विकासासाठी प्रत्येक ग्रामपंचायत सदस्यांना निधी राज्यस्तरावरूण देण्यात यावा. ग्रामपंचायत सदस्यांचा भत्ता, सरपंच, उपसरपंच यांचे थकीत मानधन तात्काळ अदा करावे व त्यात भरीव वाढ करण्यात यावी. विमा संरक्षण द्यावे, शासकीय कमिटीत स्थान असावे, टोल माफी मिळावी इत्यादी मागण्यासाठी हा तीन दिवसाचा काम बंद संप पुकारण्यात आला आहे.

या आंदोलनात जिल्हयातील सर्व सरपंच , ग्रामसेवक, ग्रामरोजगार सेवक, ग्रामपंचायत कर्मचारी व संगणक परिचालक यांनी सहभागी होऊन संप शंभर टक्के यशस्वी करण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन डीएनई १३६ चे मराठवाडा विभागीय सचिव सखाराम काशिद, बीड जिल्हाध्यक्ष मधुकर शेळके व जिल्हा सरचिटणीस अविनाश राठोड यांनी केले आहे.

# पत्रकार सोमनाथ मुळे यांचा कनकालेश्वर विद्यालयात सत्कार

बीड येथील रयत शिक्षण संस्थेच्या कनकालेश्वर विद्यालयात पत्रकार सोमनाथ मुळे यांचा सत्कार करण्यात आला. विद्यालयाचे मुख्याध्यापक माननीय श्री शेकडे सर यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन श्री सोमनाथ मुळे यांचा यथोचित सन्मान केला. श्री सोमनाथ मुळे हे लोकनायक या वर्तमान पत्राचे पत्रकार म्हणून कार्यरत असून सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून त्यांनी विद्यालयात मागील काही दिवसांपासून तीन वर्तमानपत्रांचे एकूण सहा अंक दररोज मोफत विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिले आहेत. यामध्ये संपादक श्री भारत गायकवाड यांचे लोकनायक, संपादक मोहनलालजी बियाणी यांचे मराठवाडा साथी हे वर्तमानपत्र तर संपादक श्रीयुत गंगाधर काळकुटे यांचे सूर्योदय अशा तीन प्रमुख वर्तमानपत्रांचे प्रत्येकी दोन याप्रमाणे सहा अंक विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी मोफत वाचण्यास मिळत आहेत. विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये शालेय शिक्षणाबरोबरच सामाजिक व चालू घडामोडी याबद्दलची माहिती विद्यार्थ्यांना वर्तमानपत्रातून मिळते. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या कनकालेश्वर विद्यालयात परिसरातील गोरगरीब विद्यार्थी शिक्षण घेतात. अशा गरीब विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीमध्ये हातभार लावून श्री मुळे यांनी या स्तुत्य उपक्रमातून समाजाप्रती असलेले दायित्व पार पाडल्याची भावना मुख्याध्यापक श्री शेकडे सर यांनी व्यक्त केली. याप्रसंगी उपस्थित सर्व शिक्षक वृंद यांनीही पत्रकार श्री सोमनाथ मुळे यांचे आभार मानून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.







बीड जिल्हा वकील संघाचे जिल्हा उपाध्यक्ष ड, डी, एस ,तांगडे यांना वाढदिवसाच्या मंगलमय शुभेच्छा देताना पत्रकार उत्तम ओव्हाळ मांग गारुडी समाजाचे जिल्हाध्यक्ष गोरख काळे व आदि

# एकता मराठी साहित्य संमेलनात होणार साहित्यिक अनंत कराड यांच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन

शिरूर कासार (प्रशांत बाफना)

तालुक्यातील गोमळवाडा येथे येत्या दि.२१ व २२ डिसेंबर रोजी ६ वे एकता मराठी साहित्य संमेलन संपन्न होत असून या कार्यक्रमात एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्य चे संस्थापक अध्यक्ष साहित्यिक अनंत कराड यांच्या 'हे रामा..' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन होणार असल्याची माहिती फाउंडेशन च्या पदाधिकाऱ्यांनी दिली.




उद्घाटक जेष्ठ साहित्यिक मा.बाबा भांड, संमेलनाध्यक्ष प्रा.डॉ.भास्कर बडे, अतिथी पोलीस अधीक्षक मा.नंदकुमार ठाकूर, मुख्यकार्यकारी अधिकारी मा.अविनाश पाठक, श्रीराम संस्थानचे महंत भानुदास महाराज शास्त्री, शिक्षणाधिकारी मा.नागनाथ शिंदे, सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण मा.रविंद्र शिंदे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ.सचिन सानप, ६ व्या एकता मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष अजिनाथ गवळी आदी मान्यवरांच्या हस्ते साहित्यिक अनंत कराड यांच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन होईल. यापूर्वी कराड यांची 'काळ्याई', 'अंदमानचा प्रवास', 'मनीच्या कविता' ही पुस्तके प्रकाशित झालेली आहेत.

'हे रामा..' या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन प्रसंगी परिसरातील साहित्यप्रेमी नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन एकता फाउंडेशन चे पदाधिकारी पत्रकार गोकुळ पवार, शिवलिंग परळकर, माही शेख, ड.भाग्यश्री ढाकणे, दिपक महाले, कैलास तुपे, लखुळ मुळे, नितीन कैतके, राजेश बीडकर, रंजना फुंदे, मिरा दगडखैर, रंजना डोळे, डॉ.शोभा सानप, शोभा राजळे, लता बडे, ज्ञानेश्वर पोकळे, हरिप्रसाद गाडेकर यांनी केले आहे.

# युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या युवा आघाडी जिल्हाध्यक्ष पदी हरिओम क्षीरसागर यांची निवड

बीड ।प्रतिनिधी

बीड तालुक्यात असणारे लिंबागणेश गाव हे सध्या प्रत्येक विषयात चर्चेत असुन गावातील युवक प्रत्येक क्षेत्रात आपल व आपल्या गावचं नाव लौकीक करत आहेत. तसेच येथील रहिवासी असणारे युवा पत्रकार हरिओम क्षीरसागर हे आपल्या गावात असणाऱ्या प्रत्येक प्रश्नांकडे त्यांचे बारीक लक्ष असते . गावाचे नाव मोठे होण्यापेक्षा गाव मोठे व्हावे मग नाव आपोआप मोठे होते या तत्त्वावर चालणारे तसेच ग्रामीण क्षेत्राशी नाळ जोडलेली असल्यामुळे सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असणारे असे त्यांची ओळख आहे . युवा ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. गणेश कचकलवार यांनी त्यांच्या सामाजिक तसेच निर्भिड पत्रकारिता या कार्याची दखल घेऊन त्यांना युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या युवा आघाडी बीड जिल्हा उपाध्यक्ष पदी नियुक्ती पत्र देऊन निवड केली होती युवा ग्रामीण पत्रकार संघ वाढीसाठी केलेल्या कामाची दखल घेऊन युवा आघाडी बीड जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. युवा ग्रामीण पत्रकार संघ युवा आघाडी बीड जिल्हाध्यक्षपदी आपली निवड



गोरगरीब, शेतमजुर, अन्यायाला वाचा फोडण्यासाठी तसेच पत्रकारांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहण्यासाठी हि संघटना संपुर्ण राज्यात काम करत आहे . अशीच कामे आपल्या हातुन घडावी असे मा. गणेश कचकलावर म्हणाले याच वेळी नियुक्ती पत्र मिळताच त्यांच्या मित्र परिवाराकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत असुन यावेळी हरिओम क्षीरसागर म्हणाले की जी जबाबदारी माझ्यावर राष्ट्रीय अध्यक्षांनी दिली आहे ती चांगल्या प्रकारे पार पाडून अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याचा प्रयत्न करीत राहील.



बीड पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर हे वडवणी येथील पोलिस स्टेशनमध्ये इन्स्पेक्शन साठी आले होते.यावेळी त्यांचे यथोचित सत्कार करुन स्वागत करताना संपादक अनिल वाघमारे दिसत आहेत..

# मानवीहक्काची चळवळ उभी करण्यासाठी गावोगावी मानवी हक्क रक्षक कार्यकर्ते तयार करणार: राजेश घोडे

माजलगाव ।प्रतिनिधी

दिनांक १७ डिसेंबर २०२३ रोजी माजलगाव येथील हॉटेल वेंकटेश येथे कर्मवीर एकनाथ आव्हाड ऊसतोड कामगार संघटना व मानवी हक्क अभियानाच्या वतीने माजलगाव मतदार संघातील ४० गावातील ५० कार्यकर्त्यांना मानवी हक्क रक्षकाची जबाबदारी तरुण कार्यकर्त्यांच्या खांद्यावरती देऊन त्यांना येणाऱ्या काळातील आव्हाने समाजापुढील प्रश्न व त्या प्रश्नांना घेऊन सर्व सामान्य माणसाच्या मानवी हक्काचे रक्षण करण्या संदर्भात या केडर कॅम्पमध्ये मार्गदर्शन करण्यात आले यामध्ये ऊसतोड कामगार संघटनेचे अध्यक्ष राजेश घोडे , मानवी हक्क रक्षकांचे नेते, कडूदास जी कांबळे, एडवोकेट सिद्धार्थ शिंदे, शिवाजी भाऊ सुतार, मानवी हक्क अभियान युवा जिल्हाध्यक्ष बीड विनोद दादा हातागळे, एडवोकेट याकूब भाई ,मानवी हक्क अभियान जिल्हा उपाध्यक्ष महादेव उमाप, वडवणी तालुकाध्यक्ष विष्णू मुजमुले, यांनी मार्गदर्शन केले या प्रशिक्षण शिबिरामध्ये ऊसतोड कामगारांचे प्रश्न त्यांच्या पुढील आव्हाने व उपाय योजना, जमिनीचे प्रश्न व ट्रॉसिटी अशा अन्य विषयावरती वरील मार्गदर्शकाने मार्गदर्शन केले शेवटी लोकांवरती होणारा अन्याय आम्ही उघड्या डोळ्यांनी बघणार नाही व अन्यायाला विरोध करण्यासाठी पुढील गावांमध्ये ह्यूमन राईट डिफेंडर तयार करण्याची जबाबदारी प्रशिक्षणामध्ये आलेल्या सर्व कार्यकर्त्यांनी घेतली हा केडर कॅम्प यशस्वी करण्यासाठी बंडू खंडागळे,संदीप वाघमारे, रामेश्वर खंडागळे, मच्छिंद्र उफाडे, बंडू मुजमुले, महादेव आडागळे, जावळे, अनिकेत वाघमारे, गोपाल वाघमारे, कपिल अडागळे, प्रकाश थोरात, सुनिल थोरात यांच्यासहित आधी कार्यकर्त्यांनी घेतली होती



# चोरांची वाढली डेरींग..! पोलीस चौकी समोरच चोरी

**नेकनुर पोलीस स्टेशनला कर्तव्यदक्ष अधिकारी मिळेल का?**

बीड ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश परीसरात चोरट्यांनी धुमाकूळ घातला असुन चोरट्यांनी आता त्यांचा मोर्चा शासकीय कार्यालयाकडे वळवला असुन आज दि.१८ डिसेंबर सोमवार रोजी पहाटे लिंबागणेश येथील ग्रामपंचायत कार्यालय इमारतीतील बीएसएनएल टॉवर कार्यालयात घुसून चोरीला नेण्याचा प्रकार उघडकीस आला असुन परीसरातील चो-यामुळे ग्रामस्थांनी तिव्र नाराजी व्यक्त केली आहे. आज सकाळी पहाटे ५ वाजता ग्रामपंचायत कर्मचारी कचरू सखाराम निर्मळ हे साफसफाई करण्यासाठी आले असता त्यांना बीएसएनएल टॉवर कार्यालयाचे कुलुप तुटलेले दिसुन आले.त्यांनी सरपंच बालासाहेब जाधव व कर्मचारी जीवन मुळे यांना कल्पना दिली.सरपंच यानी ताबडतोब घटनास्थळी पाहणी केली असता बॅटऱ्यांचे चोरी झाल्याचे निदर्शनास आले याविषयी सपोनी विलास हजारे नेकनूर पोलीस स्टेशन व बीएसएनएलचे अधिकारी श्री तिवारी यांना फोनवरून कल्पना दिली.

जिल्हा परीक्षा सर्कल असलेल्या लिंबागणेश पोलिस चौकीवर २९ गावांची जबाबदारी आहे. कर्मचारी संख्या मात्र चारच आहेत. पोलिस चौकी मध्ये निवासी कर्मचारी असावेत यासाठी ग्रामस्थांनी वारंवार निवेदन देऊन सुद्धा पोलिस प्रशासन लक्ष देत नाही.नेकनुर पोलिस स्टेशनचे सपोनी विलास हजारे यांना निवेदन देण्यास गेलेल्या ग्रामस्थांचे निवेदन सुद्धा हजारे यांनी स्विकारले नाही.त्यामुळे नेकनुर पोलिस प्रशासनाविषयी ग्रामस्थांची तिव्र नाराजी आहे व ही संपूर्ण घटना कॅमेऱ्यात मध्ये कैद झालेली असून नेकनूर पोलीस स्टेशनवर गुन्ह्याच्या तपासाचे मोठे आव्हान आहे.





आज गेवराई विधानसभा मतदारसंघाचे युवानेते माननीय शिवराज दादापवार यांनी ईनुसभाई बागवान यांच्या मुलीच्या लग्नाला उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या,त्यावेळी या विवाहप्रसंगी लक्ष्मण सेना प्रमुख नगरसेवक याहिया खान,हशमभाई शेख,खलील भाई बागवान,माणिक(शेठ)बागवान मतीनभाई कुरेशी,रईसभाई आत्तार व कृष्णा(भैय्या)पाटोळे इतर कार्यकर्ते आणि मित्रपरिवार या विवाहप्रसंगी उपस्थित होते.



श्री.खंडोबाच्या चंपाषष्ठी उत्सवा निमित्त खंडोबा मंदीर अंबाजोगाई येथे खंडोबाची आरती करून पालखीचे दर्शन घेताना आ. नमिताताई मुंदडा, श्री अक्षयभैय्या मुंदडा, श्री.सारंग पुजारी, श्री.राऊत गुरुजी व ईतर मान्यवर.



विडा – कार्यशील आमदार मा.नमिता ताई अक्षय मुंदडा यांच्या २५ १५ फंडातून खंडोबा मंदिर विडा येथील सभामंडपाचे लोकार्पण सोहळा संपन्न झाला.. या प्रसंगी ह.भ.प.महंत श्रीराम महाराज विडेकर (मठाधिपती साधू शिवरामपुरी मठ संस्थान विडा),मा.श्री नंदकिशोर (काकाजी) मुंदडा, श्री विजयकांत मुंडे ,श्री राहुल गदळे, श्री अंकुश कलाने,श्री सचिन गायकवाड, श्री बाळासाहेब हराळे,संतोष जाधव, चंदू मिसळ, अशोक दादा वाघमारे, शिवाजी वाघमारे, मारुती आप्पा घुटे,लालासाहेब नन्नवरे,अंकुश काळे, दादाराव भाऊ घुटे, राजेभाऊ हाराळे,ऋषिकेश पटाईत, मुकुंद बप्पा निर्मळ,गायकवाड रामदास, रजनीकांत देशमुख,रावसाहेब भाऊ घुटे, चंद्रकांत कुलकर्णी,दीपक वाघमारे, नारायण वाघमारे,लिबराज गायके, वाघमारे उत्तम बापू, शहाजीघुटे,आशोक घोरपडे,दत्ता सांवत, अशोक राऊत,आशोक ढोबळे, शिवाजी काळे,विठ्ठल गायकवाड,आजिम इनामदार,भागवत नन्नवरे,प्रकाश रोमन, सुरेश यादव,शिवाजी कोरडे,अनिल कोरडे,अभिमान घोडके,नाना पटाईत,बाजीराव कोरडे, किशोर देशमुख, वैभव घुटे,विजय शिंदे,सागर घुटे,तुषार राऊत,संभाजी घुटे,अभिराज देशमुख ,धनराज पवार तसेच गावातील खंडोबा भक्त हरज होते.

# आदित्य कृषि महाविद्यालयातील कृषिदुतांनी दिली बीड येथील कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन संस्थेला भेट

बीड।प्रतिनिधी

आदित्य कृषि महाविद्यालयातील चौथ्या वर्षातील कृषि कार्यानुभव कृषिदूत प्रफुल देवगडे, राम गडदे, महेश कवडेवार, उमेश गायकवाड, अमोल चव्हाण, ज्ञानेश्वर गौरकर, भागवत शिंदे, विशाल गंदेरवाड यांनी बीड येथील कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन संस्थेला भेट दिली आणि तेथे विविध प्रात्यक्षिक करण्याचे प्रशिक्षण घेतले. यावेळी कृषिदुतांना संस्थेचे साळवे सर यांनी विविध प्रात्यक्षिकांबद्दल मार्गदर्शन केले.




कृषिदुतांनी सर्वप्रथम श्री. साळवे सरांची भेट घेऊन त्यांच्यासोबत कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन संस्थेत एक आठवडा कोणत्या प्रकारे काम करायचे यावर चर्चा केली. त्यानंतर कृषिदुतांनी ठरल्याप्रमाणे संस्थेअंतर्गत काम करणाऱ्या बचत गटाची माहिती जाणून घेतली. त्यानंतर कृषिदुतांनी विस्तार विभागाचे काम कसे चालते हे समजून घेतले. तसेच यावेळी कृषिदुतांनी संस्थेमार्फत शासनाच्या कोणत्या योजना राबविल्या जातात याबबद्दल संपुर्ण माहिती प्राप्त केली. यावेळी कृषिदुतांनी साळवे सरांनी संस्थेमार्फत कश्याप्रकारे कार्यशाळा आयोजित केल्या जातात याचे मार्गदर्शन केले.

यासाठी कृषिदुतांना आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदितीजी सारडा, आदित्य कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. सतीश कचरे, कृषि कार्यानुभव कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. संदीप मोरे, कृषि विस्तार विभागाचे प्रमुख श्री. धावणे सर यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले.

# मुद्रांक शुल्क अभय योजनेचा नागरिकांनी लाभ घ्यावा



## रक्कम पंचवीस कोटी पर्यंत असल्यास

मुद्रांक शुल्कात २५% व दंडामध्ये या योजनेचा लाभ घेण्याकरता संबंधितांनी आपला अर्ज सर्व दुय्यम निबंध कार्यालय आणि सहनिबंधक जिल्हा मुद्रांक जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे सादर करावा आणि अभय योजनेच्या अंतर्गत मुद्रांकाच्या दंड सवलत योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुद्रांक जिल्हाधिकारी अशोक आटोळे, प्रशासकीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक एस एम शेख, दुय्यम निबंधक श्रेणी (१) एस.एच. गोपवाड, सह दुय्यम निबंधक बीड क्र. (१) पी.डी. दहिवाळ यांनी संयुक्तरीत्या केले आहे.

बीड ।प्रतिनिधी

शासनाने मुद्रांक शुल्क व दंड सुलभता अभय योजना लागू केली आहे. सदर योजना ०१ डिसेंबर २०२३ पासून ३१ जानेवारी २०२४ आणि ०१ फेब्रुवारी ते ३१ मार्च २०२४ अशा दोन टप्प्यात लागू करण्यात आली आहे. सदर योजनेमध्ये ०१ जानेवारी १९८० ते ३१ डिसेंबर २००० या कालावधीत नोंदणी दाखल केलेले किंवा न केलेले दस्त यांच्यावरील शासन आदेशाद्वारे होणाऱ्या तथा वसुली पात्र संपूर्ण मुद्रांक शुल्क आणि त्यावर लागू होणाऱ्या दंडामध्ये सुट तथा सबलत लागू करण्यात आली आहे, अशी माहिती मुद्रांक जिल्हाधिकारी अशोक आटोळे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे. या संदर्भात म्हटले आहे की, सदर सुट्टी एकदा १९८० ते ३१ डिसेंबर २००० या कालावधीतील दस्तासाठी योजनेच्या पहिल्या टप्प्यात देय होणाऱ्या मुद्रांक मुद्रांक

**जिल्हाधिकारी आटोळे यांचे आवाहन**

शुल्कासाठी फुलकाची रक्कम एक लाखापर्यंत असल्यास मुद्रांक शुल्क व दंडाचे रक्कम माफी तसेच ते होणारी मुद्रांक शुल्काचे रक्कम एक लाखाच्यावर असल्यास मुद्रांक शुल्कात ५० टक्के व दंडाची संपूर्ण माफी देण्यात येणार आहे. या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात देय होणारी मुद्रांक शुल्काची रक्कम १ लाखापर्यंत असल्यास मुद्रांक शुल्कात व दंडामध्ये ८० टक्के कपात करण्यात आली आहे. एक जानेवारी २००१ ते ३१ डिसेंबर २०२० या कालावधीतील दस्तासाठी योजनेच्या पहिल्या टप्प्यात देय होणारी मुद्रांक शुल्काची रक्कम २५ कोटीपर्यंत असल्यास मुद्रांक शुल्कात २५ टक्के माफी व दंडाचे रक्कम ही २५ लाखापेक्षा कमी असल्यास दंडामध्ये ९० टक्के माफी तसेच दंडाची रक्कम २५ लाखापेक्षा जास्त असल्यास केवळ २५ लाख रक्कम दंड म्हणून स्वीकारण्यात येऊन उर्वरित दंडाच्या रकमेत माफी देणारे मुद्रांक शुल्काचे रक्कम २५ कोटीपेक्षा जास्त असल्यास मुद्रांक शुल्कास वीस टक्के माफी तसेच दंडामध्ये कुठे रक्कम स्वीकारून उर्वरित दंडाच्या रकमेत सुट मिळणार आहे.



# गेवराई तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसला खिंडार

## बालानाईक तांड्याचे उपसरपंचासह, ग्रामपंचायत सदस्यांचा आ. लक्ष्मण पवार यांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश

गेवराई ।प्रतिनिधी

तालुक्यातील चकलंबा सर्कलमधील बालानाईक ग्रामपंचायत मधील उपसरपंच तोताबाई तारू चव्हाण यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य महादेव गाढे, विजय पवार, राजेंद्र सांगळे, विजय सांगळे, रमेश सांगळे यांचा कार्यसम्राट आमदार लक्ष्मण पवार यांच्या नेतृत्वाखाली भाजप मध्ये प्रवेश झाला. याविषयी सविस्तर माहिती अशी की, बालानाईक तांडा ग्रामपंचायत ही नव्याने निर्माण झाली असून, पहिल्यांदाच बिनविरोध निवड झाली होती. यांनातर सर्वांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासोबत काम करण्याचा निर्णय घेतला होता. एक वर्षे होऊनही ग्रामपंचायत मध्ये

कुठलेही विकासाच्या काम होत नाही याला कंटाळून अखेर उपसरपंच तोताबाई तारू चव्हाण यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य महादेव गाळे, विजय पवार, राजेंद्र सांगळे, विजय सांगळे, रमेश सांगळे, सुभाष चव्हाण कार्यसम्राट आमदार लक्ष्मण पवार यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला आहे. गेवराई विधानसभा मतदारसंघातील कार्यसम्राट आमदार लक्ष्मण पवार यांचे विकास कामे पाहून असंख्य कार्यकर्त्यांचा प्रवेश भाजप मध्ये होत आहे. आजच्या प्रवेशाने राष्ट्रवादी काँग्रेसला खिंडार पडण्यास सुरुवात झाली आहे. या प्रवेशावेळी भारतीय जनता युवा मोर्चाचे दत्ता जाधव, ज्येष्ठनेते पुरुषोत्तम तात्या दाभाडे उपस्थित होते.

# सत्ता असो वा नसो विकासाची कामं मार्गी लावण्यासाठी लोकनेते माजी मंत्री श्री जयदत्त अण्णा क्षीरसागर नेहमीच प्रयत्नशील

आपल्या मतदार संघातील विविध विकास कामे मार्गी लावण्यासाठी मुंबई मंत्रालयातील अधिकारी राज्यांचे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री मंत्री यांना भेटून बीड मतदार संघात विकासाची गंगा खेचून आणण्याची क्षमता असलेला प्रामाणिक लोकनेता गेल्या पाच सहा दिवसांपासून नागपूर हिवाळी अधिवेशनामध्ये आपल्या भागातील विकासाचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपला नेता प्रयत्नशील आहे. विकासाची जाण असणाऱ्या नेत्यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याचा योग आपल्या सर्वांना जुळून आला आहे.बीड येथे जिल्हाधिकारी प्रशासकीय इमारत या कामासाठी माजी मंत्री श्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या प्रयत्नामुळे ७० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला. बीड शहरातील बस स्थानकासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध



करून आज बीड बस स्थानकाचे काम प्रगतीपथावर आहे. माझ्या ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी गोरगरीब जनतेसाठी रायमोहा या ठिकाणी भव्य अशा इमारतींचे काम प्रगतीपथावर आहे. शेतकऱ्यांच्या मागणी नुसार पांदण शेत रस्ते या कामासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला त्याही कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे. प्रत्यक्ष मतदारसंघातील लोकांशी चर्चा करत असताना कार्यरत असलेले कामं लोक याचि देही याचि डोळा पाहतात आहेत. साहेबांच्या कामांचा असलेला अनुभव सांगत आहेत. आज आपल्या बीड शहरात व ग्रामीण भागामध्ये आपल्या सर्वांचे लोकनेते यांच्या कार्यक्षमतेने घडत असणारे हे बदल एक सर्व सामान्य कार्यकर्ता म्हणून म्हणून नक्कीच सुखावणारे आहेत. पण् भविष्यात असेच अनेक बदल घडत शहराचा ग्रामीण भागातील मतदारसंघाचा विकास व्हावा यासाठी येणाऱ्या २०२४ मध्ये माजी मंत्री श्री जयदत्त अण्णा क्षीरसागर हे मोठ्या मताधिक्याने महाराष्ट्राच्या सार्वभौम सभागृहामध्ये आमदार मंत्री म्हणून जावेत हीच सदिच्छा.

– श्री. वंजारे सर आर्वी हायस्कूल

# बसमधून महिलेचे तीन लाखांचे दागिने चोरीला

# अज्ञात महिलेविरुद्ध गेवराई ठाण्यात गुन्हा

गेवराई ।प्रतिनिधी

येथील बसस्थानकातून बीड शहराकडे जाणाऱ्या महिलेचे बसमधून ३ लाखांचे दागिने चोरीला गेले. ही घटना शनिवारी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास घडली. याप्रकरणी महिलेच्या तक्रारीवरून गेवराई पोलिसांत गुन्हा नोंद केला आहे.बीड शहरातील कबाड गल्ली येथील रहिवासी ललिता अडाणे (वय ४२, रा. कबाड गल्ली, बीड) शनिवारी सकाळी बालमटाकळी (ता. शेवगाव, जि. नगर) येथे पाहुण्यांच्या लग्न समारंभासाठी गेल्या होत्या. लग्न समारंभ आटोपल्यानंतर त्या बीडकडे परत निघाल्या. त्या गेवराई बसस्थानकातून छत्रपती संभाजीनगर- अंबाजोगाई या बसमध्ये बसल्या.यावेळी



त्यांनी बॅगमधील पाकिटात ठेवलेले सोन्याचे लॉग गंठण, मिनी गंठण, ठुसी, कानातील झुंबर असे ८० ग्रॅम सोन्याचे दागिने अज्ञात महिलेने चोरून नेले. ललित अडाणे यांच्या फिर्यादीवरून गेवराई पोलिस ठाण्यात अज्ञात महिलेविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास रवींद्र राऊत करीत आहेत.



आमचे मित्र बंधू आमदार अमरसिंह पंडित यांचे विश्वासू सहकारी विजय चांदणे याच्या गृहप्रवेश कार्यक्रमा निमित्त शुभेच्छा दिल्या असताना सायं दैनिक महाराष्ट्र आरंभ संपादक दिपक थोरात, माजी सरपंच बबन वाघमारे

# अकराव्या दिवशी बेमुदत आंदोलन लेखी आश्वासनानंतर स्थगित

## सुट्टीचा दिवस असुनही मा. तहसीलदार संतोष बन साहेबांनी घेतली आंदोलनाची दखल

पाटोदा ।प्रतिनिधी

भारतीय कम्युनिस्ट पक्ष व भारतीय शेतकरी कामगार पक्ष, किसान सभेच्या वतीने दि.७ डिसेंबर पासून खरीप हंगामाचा १००%पिकविमा देण्यात यावा व पैठण ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग (पालखी मार्ग)याचे रखडलेले काम त्वरित करावे या मागण्यांसाठी बेमुदत साखळी उपोषण पुकारले होते.कारण की जरी कृषीमंत्री म्हणाले की २५% अग्रीम पिकविमा देऊन शेतकऱ्यांची दिवाळी गोड करू तरी आजतागायत शेतकऱ्यांच्या खात्यावर मंजूर पिकविम्याची रक्कम वर्ग करण्यात आली नाही. प्रत्यक्षात शेतकऱ्यांचा खरीप हंगाम पाऊसाचा खंड व परतीच्या पाऊसाने पुर्णतःहा वाया गेलेला होता तरी शेतकऱ्यांना १००% पिकविमा देण्यात यावा तसेच पैठण-पंढरपूर राष्ट्रीय महामार्गाचे काम मागील ५ वर्षांपासून रखडले असुन




मतदारसंघाला दोन आमदार असूनही दुर्लक्ष होत असल्याने वेळोवेळी आंदोलन रस्ता रोको करूनही काम पुर्ण होत नसल्याने बेमुदत साखळी आंदोलन करण्यात येत होते.याबाबतीत मा.तहसीलदार संतोष बन साहेबांनी संबधीत विभागाच्या अधिकाऱ्यांना पत्रव्यवहार करून आंदोलनकर्त्यांची भावना त्यांच्यापर्यंत पोहोच करून आज दि.१७ डिसेंबर रविवार असुनही स्वतः आंदोलनकर्त्यांची भेट घेत लेखी आश्वासन देत साखळी उपोषण सोडवण्यासाठी परिश्रम घेतल्याचे दिसून आले.दिलेल्या लेखीत नमूद केले आहे की. २५% अग्रीम पिकविमा ३१ डिसेंबर पर्यंत सर्व शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात येईल १००% पिकविम्या बाबतीत पिक कापणी प्रयोग अंतर्गत अंतिम उबंरठा उत्पादन या वर पिकविमा लागु झाला तर पैसे मिळतील तर पैठण-पंढरपूर राष्ट्रीय महामार्गाचे रखडलेली कामे तात्काळ पुर्ण करण्याचे निर्देश देऊन अनुपालन अहवाल सादर करण्याबाबत सुचित करण्यात आलेले आहे. दुधाच्या भाव वाढी संदर्भात आपली मागणी राज्य शासनाला कळविण्यात येईल असे लिखित आश्वासन मा.तहसीलदार संतोष बन साहेबांनी दिल्याने साखळी उपोषण स्थगित करण्यात आले आहे.

# आदित्य शिक्षण संस्थेतील फार्मसीच्या विद्यार्थ्यांना आयुष्मान कार्ड बनविण्याचे प्रात्यक्षिक

बीड । प्रतिनिधी

डी. फार्मसी बी. फार्मसी मध्ये शिकत असलेले आजचे विद्यार्थी भविष्यात फार्मासिस्ट म्हणून कार्यरत होणार आहेत. तसेच समाजिक आरोग्याचा एक आधारस्तंभ म्हणून जबाबदारी पार पाडणार आहेत. नागरिकांना उच्च दर्जाची वैद्यकीय सुविधा मिळवून देण्याकरिता केंद्र शासनाने सुरू केलेली बहुचर्चित आयुष्यमान भारत योजना समाजातील प्रत्येक व्यक्तींपर्यंत पोहोचावी यासाठी आदित्य शिक्षण संस्थेतील डी. फार्मसी, बी. फार्मसीच्या विद्यार्थ्यांना आयुष्यमान कार्ड बनविण्याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा यांच्या संकल्पनेतून, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी च्या कार्यकारी सदस्य तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली फार्मसी विद्यार्थ्यांसाठी भारत सरकारच्या नॅशनल हेल्थ अथोरिटी अंतर्गत चालवल्या जाणाऱ्या आयुष्यमान भारत योजनेचे बीड जिल्हा समन्वयक डॉ.अशोक गायकवाड व



डॉ.आगलावे यांचे मार्गदर्शन ठेवण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांना आयुष्यमान कार्ड व प्रधानमंत्री जन आरोग्य योजने विषयी उपयुक्त माहिती देण्यात आली. केंद्र शासनाच्या आयुष्यमान भारत या योजनेचे दोन मुख्य आधारस्तंभ आहेत. एक म्हणजे देशात एक लाख हेल्थ अँड वेलनेस सेंटर स्थापित करणे व दुसरा दहा कोटी परिवारांना पाच लाख रुपये प्रति वर्ष स्वास्थ्य बीमा कवच प्रदान करणे हा असल्याचे डॉ.अशोक गायकवाड यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस आदित्य अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पंकज कडू सर यांनी मान्यवरांचे स्वागत केले तसेच आदित्य फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य संतोष जैन यांनी उपयुक्त अशा सेमिनार मधील मार्गदर्शनाबद्दल संस्थेच्या वतीने तसेच विद्यार्थ्यांतर्फे मान्यवरांचे आभार मानले. सेमिनार यशस्वी करण्यासाठी डॉ.प्राची उदापूरकर मॅडम, प्रा.ज्ञानेश्वर वाघमोडे, प्रा.विठ्ठल मुळे , प्रा.अनुजा सानप, प्रा. शिवकन्या करंडे, प्रा.शितल गोयकर आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# मुद्रांक शुल्क अभय योजनेचा नागरिकांनी लाभ घ्यावा- मुद्रांक जिल्हाधिकारी आटोळे

बीड ।प्रतिनिधी

शासनाने मुद्रांक शुल्क व दंड सुलभता अभय योजना लागू केली आहे. सदर योजना ०१ डिसेंबर २०२३ पासून ३१ जानेवारी २०२४ आणि ०१ फेब्रुवारी ते ३१ मार्च २०२४ अशा दोन टप्प्यात लागू करण्यात आली आहे. सदर योजनेमध्ये ०१ जानेवारी १९८० ते ३१ डिसेंबर २००० या कालावधीत नोंदणी दाखल केलेले किंवा न केलेले दस्त यांच्यावरील शासन आदेशाद्वारे होणाऱ्या तथा वसुली पात्र संपूर्ण मुद्रांक शुल्क आणि त्यावर लागू होणाऱ्या दंडामध्ये सुट तथा सवलत लागू करण्यात आली आहे, अशी माहिती मुद्रांक जिल्हाधिकारी अशोक आटोळे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

या संदर्भात म्हटले आहे की, सदर सुट्टी एकदा १९८० ते ३१ डिसेंबर २००० या कालावधीतील दस्तासाठी योजनेच्या पहिल्या टप्प्यात देय होणाऱ्या मुद्रांक शुल्कासाठी फुलकाची रक्कम एक लाखापर्यंत असल्यास मुद्रांक शुल्क व दंडाचे रक्कम माफी तसेच ते होणारी मुद्रांक शुल्काचे रक्कम एक




लाखाच्यावर असल्यास मुद्रांक शुल्कात ५० टक्के व दंडाची संपूर्ण माफी देण्यात येणार आहे. या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात देय होणारी मुद्रांक शुल्काची रक्कम १ लाखापर्यंत असल्यास मुद्रांक शुल्कात व दंडामध्ये ८० टक्के कपात करण्यात आली आहे. एक जानेवारी २००१ ते ३१ डिसेंबर २०२० या कालावधीतील दस्तासाठी योजनेच्या पहिल्या टप्प्यात देय होणारी मुद्रांक शुल्काची रक्कम २५ कोटीपर्यंत असल्यास मुद्रांक शुल्कात २५ टक्के माफी व दंडाचे रक्कम ही २५ लाखापेक्षा कमी असल्यास दंडामध्ये ९० टक्के माफी तसेच दंडाची रक्कम २५ लाखापेक्षा जास्त असल्यास केवळ २५ लाख रक्कम दंड म्हणून स्वीकारण्यात येऊन उर्वरित दंडाच्या रकमेत माफी देणारे मुद्रांक शुल्काचे रक्कम २५ कोटीपेक्षा जास्त असल्यास मुद्रांक शुल्कास वीस टक्के माफी तसेच दंडामध्ये कुठे रक्कम स्वीकारून उर्वरित दंडाच्या रकमेत सुट मिळणार आहे. योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात देय होणारी मुद्रांक शुल्काचे रक्कम पंचवीस कोटी पर्यंत असल्यास मुद्रांक शुल्कात २५% व दंडामध्ये या योजनेचा लाभ घेण्याकरता संबंधितांनी आपला अर्ज सर्व दुय्यम निबंध कार्यालय आणि सहनिबंधक जिल्हा मुद्रांक जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे सादर करावा आणि अभय योजनेच्या अंतर्गत मुद्रांकाच्या दंड सवलत योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुद्रांक जिल्हाधिकारी अशोक आटोळे, प्रशासकीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक एस एम शेख, दुय्यम निबंधक श्रेणी (१) एस.एच. गोपवाड, सह दुय्यम निबंधक बीड क्र. (१) पी.डी. दहिवाळ यांनी संयुक्तरीत्या केले आहे.

# खाजगी पिक विमा कंपन्यांच्या धोरणांवर उभे त्रिमूर्ती सरकार!-वसंत मुंडे

परळी ।प्रतिनिधी

केंद्र व राज्य सरकारचे पिक विमा कंपन्यावर नियंत्रण कायद्याने नसल्यामुळे मुळे शेतकऱ्यांना खाजगी पिक विमा कंपन्या कडून पीक विमा मिळण्यासंदर्भात हामी नसल्याचा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला. कोरोना काळा मधील शेतकऱ्याचा हक्काचा खरीप सन २०२०आणि रब्बी २०२१ चा पिक विमा वाटप संदर्भात महाराष्ट्र सरकारकडून पी एम एफ बी वाय २०२२/सी आर ६२/११ए ,दि.१३/०७/२०२२ ला केंद्र सरकारकडे आज तागायत कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या प्रधानमंत्री पिक विमा योजनेसाठी ४ वेळा पत्र व्यवहार करूनही पिक विमा कंपनीच्या दादागिरी पुढे दोन्ही सरकार हातबल झाले असून राज्य सरकारने खाजगी कंपन्या काळ्या यादीत टाकून तात्काळ अधिवेशनामध्ये विधेयक पारित करून केंद्र सरकारकडे या पिक विमा कंपन्या अकार्यक्षम आहेत असे अभिप्राय नोंदवून कारवाई करण्यासंदर्भात प्रस्ताव मंजुरीसाठी पाठवावा अशी मागणी काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केली . महाराष्ट्रात सन २०१६ पासून खरीप,रब्बी हंगामासाठी जिल्हा निहाय खाजगी पिक विमा कंपन्यांच्या नेमणुका करण्यात आल्या,आसुन त्यामध्ये एचडीएफसी इगौ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, भारतीय कृषी विमा कंपनी, आयसीआयसी आय लोंबोर्ड जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड ,युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड तर बजाज अलायन्स जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड ई. वेगवेगळ्या जिल्ह्यात नेमणूक करण्यात आलेल्या आहेत. प्रधानमंत्री पिक विमा योजना साठी वेगवेगळे निकष केंद्र व राज्य सरकारची नियमावली व पिके पेरणी पासून काढणे पर्यंत च्या कालावधीमध्ये अतिवृष्टी, वीजं कोसळणे ,नैसर्गिक आग, गारपीट, वादळ ,चक्रीवादळ, पूर ,दुष्काळ, पाऊस कमी पडल्याने शेतीच्या उत्पन्नावर परिणाम होतो. अनेक प्रकरणे राज्य सरकार सह, तालुका न्यायालय, जिल्हा न्यायालय, उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयात चालू आहेत. शेतकऱ्यांच्या तक्रारी पिक विमा केंद्र व राज्य सरकारचे कृषी पिक विमा कंपन्या संदर्भातले खाजगी धोरण जबाबदार आहे, कारण पिक विमा कंपन्यांना २० ते ३५ टक्के कमिशन मिळते . पिक विमा कंपन्यावर राज्य व केंद्र सरकार कठोर भूमिका घेत नसल्यामुळे सर्व बाजूने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडलेला आहे.वेगवेगळे नियम दाखवून पिक विमा कंपन्या स्वतःचा स्वार्थ साधित असून त्यामध्ये अधिकारी व लोकप्रतिनिधी यांचा हात असल्याचा आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला. राज्य सरकारने १ रुपयात पिक विमा हे शेतकऱ्यांसाठी गाजर दाखवले आसुन



नियमानुसार केंद्र सरकारचा अर्धा हिस्सा व राज्य सरकारचा अर्धा हिसा एकत्र करून पीक विमा संदर्भात निकष आहेत, त्यामध्ये विमा हा शेतकऱ्यांना ज्या त्या पिकाच्या नुकसान भरपाईच्या टक्केवारी नुकसान देण्यात येते. खाजगी पिक विमा कंपन्यांनी पर्जन्यमापक यंत्रणा व हवामान केंद्राचे अधिकारी महसूल व कृषी अधिकारी तसेच लोकप्रतिनिधी यांच्या बरोबर आर्थिक तोडजोड करून महाराष्ट्रातील शेतकऱ्याचे करोडो रुपये लुटण्याचा आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला. माननीय उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाचे पिक विमा शेतकऱ्यांना वाटप करण्याच्या आदेशा राज्य सरकारकडे देऊन ही पिक विमा कंपन्या न्यायालयाच्या व सरकारचे आदेशाचे पालन करीत नाहीत,ज्या कंपनीने शेतकऱ्यांना फसवले आहे, त्या कंपनीची नियमानुसार चौकशी करून काळया यादीत टाकण्याची कारवाई करण्यात यावी. शेतकरी बांधवांनी शेतकरी विरोधी कायदे केंद्र व राज्य सरकारने केले असून बोगस बी बियाणे खते कीटकनाशके च्या संदर्भात नुकसान भरपाई देण्याची कायद्यात तरतूद नाही , शेतीमालाच्या बाजारपेठेवर शासनाचे नियंत्रण नसल्यामुळे शेतीमालाला भाव नाहीत. शेतीच्या वेगवेगळ्या योजनाचे अनुदान वेळेवर दिले जात नाही. शेतीमालाचा निर्यातीस परवानगी न देणे व आयातीस परवानगी देणे हे शासनाचे धोरण चुकीचे असून शेतकऱ्याला राजा बनवण्याची पोतराज बनवले आसुन शेतकरी सर्व बाजूने हातबल झालेला आहे. महाराष्ट्रातील पिक विमा कंपन्यानी कोरोना काळामध्ये वेगवेगळ्या अटी टाकून शेतकऱ्याला पिक विमा मिळून न देण्यामध्ये मोठे षडयंत्र रचून आजतागायत पिक विमा कंपन्या शेतकऱ्याचा पैसा वापरीत आहेत तरी पण केंद्र व राज्य सरकार कडून कंपनीवर कारवाई केली जात नाही. केंद्र व राज्य सरकारच्या एनडीआरएफ व एसडीआरएफ निकषाचे पालन खाजगी पिक विमा कंपन्या करीत नसल्यामुळे काळ्या यादीत टाकून नियमानुसार कारवाई पिक विम्याचे काम काढून घेण्यासंदर्भात कार्यवाही करावी व त्रिमूर्ती सरकारने बोगस खते बियाणे कीटकनाशके कायदा सुधारणा विधेयक मंजूर करून शेतकऱ्यांच्या पिकाची नुकसान भरपाईची देण्याची तरतूद कायद्यात करण्यात यावी .

# पीएम मोदींकडून महाराष्ट्राच्या जखमेवर मीठ चोळण्याचं पाप

राज्यातली अधोगतीचं करण्याचा निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या सरकारच्या माध्यमातून राज्यात सुरू झाली आहे. त्यामुळे मुंबईतील हिरे बाजार सूरतमध्ये नेण्यात आला असून तिथे आज शानदार उद्घाटन झाले आहे. पंतप्रधान मोदी यांच्याकडून महाराष्ट्राच्या जखमेवर मीठ चोळण्याचे पाप सुरू असल्याचा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला. सूरतमध्ये आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सूरत डायमंड एक्सचेंजचे उद्घाटन केले. याला 'सूरत डायमंड बोर्स' असेही म्हणतात. या ठिकाणी हिरे व्यापाराचे केंद्र मोठे केंद्र झाले आहे. यापूर्वी हिऱ्याची एकत्रित उलाढाल, व्यापार केंद्र हे अमेरिकेतील पेंटॉगॉनमध्ये होते. मुंबईतील अनेक हिरे व्यापाऱ्यांनी आपला व्यवसाय सूरतमध्ये



स्थलांतरीत केला आहे. त्यावरुन राज्यात राजकीय आरोप-प्रत्यारोप झाले होते. त्याशिवाय, भाजपमुळेच राज्यातील उद्योग, व्यवसाय गुजरातला वळवले जात असल्याचा आरोप करण्यात येत होता.

भंडाऱ्यात पत्रकारांशी बोलताना नाना पटोले यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. पटोले यांनी भाजपवर टीका करताना म्हटले की, महाराष्ट्रात खोक्याचं सरकार आणण्याच्या मागचा तोच उद्देश होता. खोक्याचं सरकार आल्याबरोबर भ्रष्टाचाराच्या आणि दबावानं आलेल्या सरकारने पहिल्या कॅबिनेटमध्ये बुलेट ट्रेनसाठी पैसे उपलब्ध करून दिले. नरेंद्र मोदींना असेच अपेक्षित असल्याचा आरोप पटोले यांनी केला. आता मुंबईतल्या सर्व प्रॉपर्टी अदानीला देवून मुंबई अदाणीच्या नावाने करण्याचा प्रयत्न चालविला असल्याचा आरोपही त्यांनी केला. राज्यात ईडी आणि येड्यांचं सरकार आल्यानंतर अनेक उद्योग गुजरातमध्ये गेलेत. राज्यातली अधोगतीचं करण्याचा निर्णय नरेंद्र मोदींच्या सरकारच्या माध्यमातून राज्यात सुरू झालेली आहे, हे आता स्पष्ट झालं असल्याची बोचरी टीका पटोले यांनी केली.

# परळी येथे भरडे कुटुंबाचा सामाजिक उपक्रम

## दारात बेलाचे वृक्ष लावून लग्न सोहळ्याची केली सुरुवात

**परळी / प्रतिनिधी**

**सुभाष भरडे यांनी लग्न सोहळ्या अगोदर आपले निसर्गाशी असलेले नाते घट्ट दाखवण्यासाठी एक सामाजिक उपक्रम राबवला असून त्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.डॉ.दिक्षा सुभाष भरडे व डॉ.धनंजय शिवकुमार धरने यांच्या लग्नाच्या आगोदर एक बेलाचे झाड दारात लाऊन लग्न सोहळा थाटात संपन्न पार पाडला.**

परळी येथील पंचेवटी नगर येथे लग्ना आगोदर एक बेलाचे झाड लाऊन



अखिल भारतीय वारकरी भजनी मंडळाचे अध्यक्ष ह.भ.प.रामेश्वर महाराज कोकाटे यांच्या उपस्थितीत वधू-वरांच्या शुभ हस्ते बेलाचे झाड लावण्यात आले हा आगळा वेगळा उपक्रम व आपल्या लग्नाची आठवण राहावी प्रभु वैद्यनाथाच्या पावणभुमित एक बेलाचे झाड लाऊन असा प्रत्येक विवाह सोहळ्यास जर झाड लावले तर खुपच सुंदर उपक्रम होईल व आपली आठवण सदैव राहील याच प्रमाणे भरडे परिवारांनी हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात जिवन शिंदे यांचा परिवार सौ.राधा ज्ञानेश्वर शिंदे यांच्या हस्ते बेलाची आरती करण्यात आली यावेळी विधीवत बेलाच्या झाडाची पुजन करून नव वधू-वरांच्या हस्ते पुजन करून हे बेलाचे झाड सर्वांच्या उपस्थितीत बेलाचे झाड लावण्यात आले. या सामाजिक कार्याचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे असाच उपक्रम प्रत्येक वधू-वरांनी आपल्या लग्नाची आठवण म्हणून राबवला तर ही पृथ्वी पुन्हा वृक्षांनी थाटलेली दिसेल.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT